<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ९५/२०१८ मधील नि.९४ वरील आदेश</u>

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज वादी नं.१ चे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगीकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार वादी नं. १ अब्दुलसत्तार चॉद तांबोळी हे दि. २३/०८/२०२३ रोजी दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली येथे मयत झाले आहेत. सदरील वादी नं.१ ला त्यांची पत्नी अप्सराबेगम, मुलगा तन्वीर, मुली शाहीन, शगुप्ता असे जवळचे व कायदेशीर वारस आहेत. तरी मयत वादी नं.१ यांचे वारस रेकॉर्डवर येऊन दुरुस्ती होणेत यावी. वादी नं.१ अब्दुलसत्तार चॉद तांबोळी, मयत वारस–

१अ. अप्सराबेगम मर्द अब्दुलसत्तार तांबोळी,

उ.व.– ५७, धंदा– घरकाम,

१ब. तन्वीर अब्दुलसत्तार तांबोळी,

उ.व.– ३४, धंदा– शेती व नोकरी,

१क. शाहीन अब्दुलसत्तार तांबोळी,

उ.व.– ३१, धंदा– घरकाम,

१ड. शगुप्ता मर्द इस्माईल आतार,

उ.व.– २९, धंदा– घरकाम,

नं.१अ ते १क रा. दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली.

नं.१ड रा. किस्मत मंझील, मुंढे, ता. कराड, जि. सातारा.

**२.** तरी वादी नं.१ ला वरील कायदेशीर वारस आहेत. त्याला दुसरे

जवळचे वारस कोणीही नाहीत. तरी वादी नं.१ चे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी असावी व तशी दुरुस्ती नि.१ मध्ये व दावा रजिस्टरला होणेत यावी. सदरची दावा दुरुस्ती ही मुदतीत आहे. त्यास मुदतीचे कायद्याची बाधा येत नाही. तरी सदर दुरुस्तीस परवानगी असावी अशी विनंती केली.

**३.** सदरचा दावा हा वादींनी प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणे, निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी नं.१ यांचे वारसांचा दावा चालविण्याचा अधिकार संपुष्टात येत नाही. वादी नं.१ चे वारस रेकॉर्डवर आलेस दाव्यांची पुनरावृत्ती होणार नाही. वादी नं.१ मयत झालेबाबतचा मयत दाखला नि.९३ फेरीस्तसोबत अभिलेखावर दाखल आहे तसेच वादी यांचा अर्ज मुदतीत दाखल आहे. त्यामुळे वादी नं.१ चा सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

४. संबंधित लिपीक यांनी सदर दुरुस्तीची नोंद दावा नोंदणी रजिस्टर व संगणक प्रणालीमध्ये करुन घ्यावी.

Sd/-

**( अनंत रा. टेंगसे )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,
आटपाडी.

आटपाडी.
दिनांक १४/०२/२०२४.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 14.02.2024
Order signed by the
Presiding Officer on - 14.02.2024
Order uploaded on - 14.02.2024